योगशास्त्र शुद्ध स्वरूपात पोचविण्याची जबाबदारी प्रत्येकाची

प्रात्यक्षिक सादर करताना विद्यार्थी

- संस्कृत विद्यापीठाच्या योगदिनात डॉ. उमा वैद्य

नागपूर, २१ जून ▶▶

योगप्रयोगांनी आधी कर्मेंद्रियांवर मग ज्ञानेंद्रियांवर आणि शेवटी मनावर ताबा मिळवला जातो. योग ही साधना आहे आणि त्यासाठी शारीरिक व मानसिक कष्टाची गरज असते. योग हा विनामूल्य असल्याने त्याने शारीरिक व मानसिक स्वास्थ्याची प्राप्ती होते. भारतातील प्राचीन काळातील पतंजली ऋषी यांनी ही योगसाधना सांगितली. ती प्रामाणिक व शुद्ध स्वरूपात पोचविण्याची जबाबदारी आपली आहे. योगाचे प्रमेय आणि प्रयोग स्वरूपातील ज्ञान समाजापर्यंत पोचविण्याचे दायित्व प्रत्येकाने पार पाडले पाहिजे, असे विचार अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांनी योग दिनी मांडले.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठद्वारा आंतरराष्ट्रीय योग दिन बुधवारी मधुरम् सभागृह, हिंदी मोरभवन येथे संपन्न झाला. पदव्युत्तर दर्शन शास्त्र आणि योगशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून संजीवनी योगाचे डॉ. केशव क्षीरसागर उपस्थित होते. व्यासपीठावर विशेष अतिथी आयडीबीआय बँकेचे उपव्यवस्थापक संतोष पोतदार, कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. मधुसूदन पेन्ना उपस्थित होते.

डॉ. उमा वैद्य म्हणाल्या, योग हा भोगारी म्हणजे भोगविषयक हव्यास दूर करणारा, रोगारी म्हणजे रोगांचा शत्रू तसेच आधी म्हणजे मानसिक व्याधी दूर करणारा आहे. जागा, वय व काल याचे बंधन नसल्याने योग हा त्रिकालाबाधित आहे. आजच्या योग दिनानिमित्ताने आपण योगाची दीक्षा घेतली असून वर्षभर तिचे आचरण करावे. प्रमुख अतिथी संतोष पोतदार म्हणाले, आजच्या जागतिकीकरणाच्या युगात मनाची चंचलता वाढली असून ती दूर करण्यासाठी योगशास्त्र हा रामबाण उपाय आहे. डॉ. केशव क्षीरसागर म्हणाले,२१ जून हा वर्षातील सर्वात मोठा दिवस आहे. त्याचे औचित्य साधून आजचा दिवस जागतिक योग दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. पाच हजार वर्षांपूर्वी जगाला ज्ञात असणारे ज्ञान आज नासाचे वैज्ञानिक सांगत आहेत. आपला वारसाहक्क असणारे योगशास्त्र हे एक विज्ञान असून ते सांभाळण्याची आपली जबाबदारी आहे. जनार्दनस्वामींनी योगदिनाची संकल्पना मांडली. त्यांची संकल्पना आज पंतप्रधान मोदींच्या पुढाकाराने जगातील दोनशे देशांनी राबविली आहे, याचा अभिमान असल्याचे डॉ. केशव क्षीरसागर म्हणाले.

गोंदिया येथील बालचमूने योग प्रात्यक्षिके करून दाखविली. सकाळी ७.३० ते ८.३० या वेळात सर्वसामान्यांकरिता योगाभ्यास आणि ध्यान व प्राणायाम वर्गाचे आयोजन नागपूर व रामटेक येथील मुख्यालयात अनुक्रमे डॉ. पेन्ना आणि राजेश चकिनारपुवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

◀(तभा वृत्तसेवा)

Thu, 22 June 2017
www.readwhere.com/c/20011678